5.1.3

## पोषण सप्ताहाचे आयोजन (2021-22)

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा येथे 1 ते 7 सप्टेंबर दरम्यान पोषण आहाराचे आयोजन करण्यात आले होते. दि. 1 सप्टेंबर रोजी पोषण सप्ताहाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानिमित्त विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये 'डिश डेकोरेशन स्पर्धा, राजभाजी स्पर्धा तसेच पोषण सुंदरी स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. सुजाता सबाने तसेच सौ. अस्मीता मेश्राम उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणामधून पोषण आहाराचे महत्त्व समजावून सांगितले. पोषण सुंदरी स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थीनींचे वजन, उंची आणि हिमोग्लोबीन तपासण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम यांनी गृहअर्थशास्त्र विभागामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमावर प्रकाश टाकला तसेच विद्यार्थीनींना आहार विषयक मार्गदर्शन केले. गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. निता गिरी यांनी आभार प्रदर्शन केले. तसेच संचालन प्रा. नमिता कावलकर यांनी केले. कार्यकग्रमाला प्रा. हरमकर, प्रा. राऊत, प्रा. शिंदे, प्रा. गेडाम, प्रा. सोनटक्के, प्रा. सोळंके, प्रा. विघे, प्रा. इंदापवार, प्रा. कटाईत, प्रा. देशमुख तसेच कु. पायल पाटील, कु. साक्षी चवणे, कु. प्रतिक्षा आभले व इतर विद्यार्थीनी उपस्थित होत्या.



पोषण सप्ताहाचे आयोजन

PRINCIPAL
Y. D. V. D. Arts & Commerce College, Teosa, Dist. Amravati

Y.D.V.D. Arts, Commerce College TEOSA

Scanned with CamScanner

## रोजी पोषण आहार सुदृढ आरोग्य (०१/०४/२०२१)

1 एप्रिल 2021 रोजी पोषण आहार सुदृढ आरोग्य या विषयावर गृह अर्थशास्त्र विभागांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मेश्राम सर यांनी विद्यार्थिनींची हितगुज साधले तसेच डॉक्टर नीता गिरी यांनी आरोग्य विषयक जागरूकता व आहारातील पोषण मूल्याचे महत्त्व सांगितले. बी.ए.भाग तीन च्या विद्यार्थिनींनी यावेळी विविध पदार्थांच्या माध्यमातून पोषणमूल्य कसं मिळते याविषयी प्रॅक्टिकल केले होते.



## अंगणवाडीला भेट (पोषण सप्ताह) (03/09/2021)

गृहअर्थशास्त्र विभागामध्ये पोषण सप्ताहामध्ये अंगणवाडीला भेट देण्यात आली. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून या भेटीचे आयोजन करण्यात आले.

PRINCIPAL
Y. D. V. D. Arts ...
College, ...

Y.D.V.D. Arts, Commerce College
TEOSA

Scanned with CamScanner

पोलीस स्टेशन जवळील सोटागिर महाराजांच्या मंदिराजवळच्या अंगणवाडीमध्ये गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनींनी भेट दिली. तसेच तीथे लहान मुलांना पोषण आहराचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून कविता, गाणे ऐकले तसेच त्यांच्याशी गप्पा मारल्या व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले.



अंगणवाडीला भेट (पोषण सप्ताह) (03/09/2021)

PRINCIPAL
Y. D. V. D. Arts & Commerce
College, Teosa, Dist. Amravati

Y.D.V.D. Arts, Commerce College TEOSA

Dr. Neeta Giri

CS Scanned with CamScanner